Janata Shikshan Prasarak Mandal's

# LOKNETE MARUTRAO GHULE PATIL MAHAVIDYALAYA

Dahigaon-Ne,Tal-Shevgaon, Dist -Ahmednagar.Pin414502(MH)

Ph.No.02429-272036

Email- lmgpcollege@rediffmail.com

Website-www.lmgpm.in



# Self Study Report (1st Cycle )



# Criteria-III

## Research, Innovation and Extension

### Key Indicator: 3.4
### Extension Activities

Submitted to

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

BENGALURU

Janata Shikshan Prasarak Mandal's
LOKNETE MARUTRAO GHULE PATIL MAHAVIDYALAYA
Dahigaon-Ne, Tal-Shevgaon, Dist-Ahmednagar. Pin-414502 (MH)
Ph.No.02429-272036
Email- lmgpcollege@rediffmail.com
Estd.2012 Website- www.lmgpm.in Late Marutraoji Ghule Patil
ID.No:PU/AN/ACS/124/2012 College Code No:1407 PUN Code:CAAA019580 AISHE Code:C-55461

Ref.No.: LMGPM/2023-24/ Date:17/08/2023

**Declaration**

This is to Declare that this document is prepared by the Internal Quality Assurance Cell (IQAC). All the supportive documents, Links, Reports, Presentations, Photographs, Numerical Data True copies, etc. submitted/Presented in this document are verified by IQAC. The declaration is for the purpose of NAAC accreditation of HEI for 1st Cycle academic year 2017-2018 to 2021-2022.

Co-Ordinator
IQAC
L.M.G.P.M., Dahigaon-Ne,
Tal. Shevgaon, Dist. Ahmednagar

Loknete Marutrao Ghule Patil Mahavidyalaya
ID.NO. PU/AN/ACS/124/2012
Dahigaon-ne, Tal-Shevgaon

I/C Principal
Loknete Marutrao Ghule Patil Mahavidyalaya
Dahigaon-ne, Tal-Shevgaon, Dist-Ahmednagar

**3.4.3: Number of extension and outreach programs conducted by the institution through organized forums including NSS/NCC with involvement of community during the last five years.**

## List of Extension Activities through organized forums

## Academic Year 2017-18

| Sr. No. | Name of Activity | Page No. |
|---|---|---|
| 1 | Constitution Day | 04-06 |
| 2 | NSS Special Camp- Wakadi | 07-10 |
| 3 | Savitribai Phule Birth Anniversary | 11-12 |
| 4 | Swachh V Swastha Bharat Abhiyan | 13-15 |
| 5 | Swami Vivekanand Birth Anniversary | 16-18 |
| 6 | World AIDS Day | 19-21 |

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे

**लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय**

दहिगाव-ने, ता. शेवगाव, जिल्हा- अहमदनगर

कार्यक्रम अहवाल

**संविधान दिन**

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधानाचा स्वीकार केला होता तर २६ जानेवारी १९५० रोजी ते लागू करण्यात आलं. संविधान ज्या दिवशी स्वीकारलं ती तारीख म्हणजे २६ नोव्हेंबर हा 'संविधान दिन' आणि २६ जानेवारी 'प्रजासत्ताक दिन' होय. भारत सरकारने २०१५ पासून 'संविधान दिन' साजरा करण्यास सुरुवात केली. या अनुषंगाने लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत २६/११/२०१७ रोजी रविवार असल्यामुळे शनिवार दि. २५/११/२०१७ रोजी 'संविधान दिन' साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान देण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी शेवगाव चे कामगार तलाठी श्री.लवांडे व त्यांचे सहकारी यांनी विद्यार्थ्यांना संविधान निर्मिती विषयी माहिती देऊन संविधानानुसार मतदान प्रक्रिया कशी चालते याचे प्रात्यक्षिक दाखविले

या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. प्रा. संदीप नलावडे यांनी प्रास्ताविक तर प्रा. दिपक देवकर यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. रवींद्र गायकवाड, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S) दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

**Mr.Lawande Guided Students about Election Process on Constitution Day**





लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर
राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S)



Principal
Loknete Marutrao Ghule Patil Mahavidyalaya
Dahigaon-ne, Tal-Shevgaon, Dist-Ahmednagar

जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित

**लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय**

दहिगाव-ने, ता.शेवगाव, जि.अहमदनगर

## विशेष हिवाळी शिबीर अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय, दहिगाव-ने यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चे राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर दि.०४/१२/२०१७ ते १०/१२/२०१७ या कालावधीत मौजे वाकडी ता.नेवासा, जि.अहमदनगर येथे संपन्न झाले या शिबीरामध्ये गाव स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, जलसंवर्धन इ.उदिष्टे समोर ठेऊन कार्यक्रम घेण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन गावचे उपसरपंच मा.श्री.भाऊसाहेब पाटील भगत यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नाबदे आर.पी. उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सौ.ताराबाई किसन वडागळे होत्या तसेच या प्रसंगी ग्रामस्थ, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा.गायकवाड आर.एम. यांनी केले व आभार प्रा.नलावडे एस.ए. यांनी केले.

या शिबीर कालावधीत गावामध्ये १०० झाडे लावण्यात आली तसेच समाज कल्याण ऑफिस स्वच्छता, हनुमान मंदिर स्वच्छता, गोशाळा स्वच्छता, मंदिर परिसर वृक्षारोपण, शोष खड्डे, बंधारा दुरुस्ती तसेच शेवटच्या दिवशी गावामध्ये घरोघरी जाऊन वृक्ष संगोपण बाबतीत माहिती देण्यात आली तसेच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले या रक्तदान शिबिरामध्ये अनेक तरुणांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले.

या शिबीर कालावधीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणेसाठी व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात त्यानुसार दि.०५/१२/२०१७ रोजी पर्यावरण सुरक्षा काळाची गरज या विषयावर प्रा.काकासाहेब लांडे यांचे व्याख्यान झाले, दि.०६/१२/२०१७ रोजी आजचा तरुण दशा आणि दिशा विषयावर विशेष व्याख्यान ह.भ.प.राम महाराज झिंजुर्के यांनी दिले, दि.०७/१२/२०१७ रोजी सामाजिक बांधिलकी आणि एन.एस.एस. या विषयावर प्राचार्य डॉ.डी.एन.वाबळे यांनी विशेष मार्गदर्शन केले, दि.०८/१२/२०१७ रोजी मी ग्राम उद्योजक होणारच या विषयावर श्री.रेवणनाथ नजन यांनी विशेष मार्गदर्शन केले, जल व्यवस्थापनावर प्रा.डॉ.राजेंद्र नाबदे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

विशेष हिवाळी शिबीराचा समारोप दि.१०/१२/२०१७ रोजी करण्यात आला. समारोप कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानेश्वर सह.सा.कारखाना भेंडे चे एम.डी.श्री.काकासाहेब शिंदे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालय प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा.गायकवाड आर.एम. यांनी केले व आभार श्रीम.देशमुख ए.एच. यांनी केले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

**Chief Guest Kakasaheb Shinde addressing to students at the inauguration of NSS Special camp**




**Volunteers to plant trees on special NSS Camp**



## Volunteers clean up village areas



## Volunteers to dig arid pits





## Volunteers performing street plays






नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

## श्रम संस्कार शिबिरातील अनुभवच संघर्षमय जीवनात उपयोगी येतात : भगत

### घुले महाविद्यालयाच्या सेवा योजना शिबिराचा वाकडीत प्रारंभ

भावीनिमगाव (वार्ताहर) - श्रम संस्कार शिबिरामधून विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन अनुभवायला मिळते. हेच अनुभव संघर्षमय जीवनात उपयोगी पडत असल्याचे मत वाकडीचे उपसरपंच भाऊसाहेब भगत यांनी व्यक्त केले.

शेवगाव तालुक्यातील दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन वाकडी (ता. नेवासा) येथे केल्यानंतर उपसरपंच भाऊसाहेब भगत बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच ताराबाई वडागळे या होत्या.

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन केल्यानंतर मार्गदर्शन करताना भाऊसाहेब भगत.

यावेळी प्राचार्य डॉ. डी. एन. वाबळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक महादेव शिरसाठ, प्रा. नाबदे, ग्रामविकास अधिकारी काळे, माजी सरपंच अशोक गायकवाड, प्रा. दीपक देवकर, अमोल गायकवाड, महादेव म्हस्के, बाबासाहेब घुले, प्रा. अश्विनी देशमुख, विद्यार्थी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

शिबिरात पाणलोट विकास व आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता अभियान, नैसर्गिक शेती, गटरचना तर सांस्कृतिक कार्यक्रमातून जनजागृती करत पथनाट्याद्वारे हागणदारी मुक्तगाव संदेश अशा विविध समाजोपयोगी व स्वच्छतेची कामे होणार आहेत.

प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र गायकवाड यांनी केले. सूत्रसंचलन विद्यार्थी स्वयंसेवक प्रियंका मरकड व रेणुकादास निंबाळकर यांनी केले. गणेश कर्डिले यांनी आभार मानले.



जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे

**लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय**

दहिगाव-ने, ता. शेवगाव, जिल्हा- अहमदनगर

कार्यक्रम अहवाल

**सावित्रीबाई फुले जयंती**

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत बुधवार दि. ०३/०१/२०१८ रोजी भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका ‘सावित्रीबाई फुले जयंती’ साजरी करण्यात आली.

भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान देण्यात आले. महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील प्रा. सौ. अश्विनी देशमुख या प्रमुख व्याख्यात्या होत्या. सौ. देशमुख यांनी आपल्या व्याख्यानातून सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. अत्यंत कठीण परिस्थितीत सावित्रीबाई यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या बरोबरीने बहुजन समाजाच्या उन्नतीचे कार्य करत महिलांना शिक्षणाची दारे खुली करून दिली असल्याचे प्रतिपादन सौ. देशमुख यांनी केले.

या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब वाबळे हे अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. रवींद्र गायकवाड यांनी प्रास्ताविक तर डॉ. राजेंद्र नाबदे यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी यांनी प्रयत्न केले.

राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S)

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना
(N.S.S)
दहिगाव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

**Prof. Mrs.Deshmukh A.H. Addressing Students on Savitribai Phule Birth Anniversary**






जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे

**लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय**

दहिगाव-ने, ता. शेवगाव, जिल्हा- अहमदनगर

कार्यक्रम अहवाल

## ‘स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान’

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत सोमवार दि. ०७/०८/२०१७ रोजी ‘स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान’ उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन गावातून फेरी काढली व गावातील प्रमुख ठिकाणी स्वच्छता केली. महाविद्यालयाच्या प्रांगणातून फेरीला सुरुवात होऊन बस स्टँड- मुख्य पेठ- बाजारताळ व परत महाविद्यालयात फेरीचा शेवट करण्यात आला. या फेरीत स्वच्छतेविषयी विविध घोषणा देऊन लोकांपर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहोचविला. कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या पथ नाट्याचेही सादरीकरण केले व या पथनाट्याच्या माध्यमातून गावातील लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे गावातील लोकांनी कौतुक केले.

या अभियानामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. गावातील लोकांनीही या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. रवींद्र गायकवाड, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S)
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

Rgaikwad
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

**Student giving message of Clean & Healthy India through Act play in community**







राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S)

राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S)

**Students Creating Awareness about Clean & Healthy India through Rally**






जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे

# लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय

दहिगाव-ने, ता. शेवगाव, जिल्हा- अहमदनगर

कार्यक्रम अहवाल

## स्वामी विवेकानंद जयंती निमित्त युवा सप्ताह

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील NSS विभागामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार स्वामी विवेकानंद जयंती निमित्त दि. १२ ते १६ जानेवारी २०१८ दरम्यान महाविद्यालयामध्ये युवा सप्ताह साजरा करण्यात आला. दि. १२ ते १६ जानेवारी २०१८ या कालावधीत स्वामी विवेकानंदांचे विचार व आजचा युवक या विषयावर प्रा. म्हस्के एम.बी., स्वच्छ व स्वस्थ भारत विषयावर प्रा.घुले बी. एस, वित्तीय साक्षरता अभियान विषयावर प्रा. नलावडे. एस.ए यांनी व्याख्यान दिले. मतदार जन जागृती विषयावर विद्यार्थी चर्चासत्र व मनोगत झाले. तसेच युवकांमधील वैज्ञानिक दृष्टीकोण विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. थोडक्यात रूपरेषा खालीलप्रमाणे-

| दिनांक | विषयाचे नाव | व्याख्याते |
|---|---|---|
| १२/१/२०१८ | स्वामी विवेकानंदांचे विचार व आजचा युवक | प्रा.म्हस्के एम.बी. |
| १३/१/२०१८ | स्वच्छ व स्वस्थ भारत | प्रा.घुले बी. एस. |
| १४/१/२०१८ | वित्तीय साक्षरता अभियान | प्रा.नलावडे एस.ए. |
| १५/१/२०१८ | मतदार जन जागृती | विद्यार्थी चर्चासत्र व मनोगत |
| १६/१/२०१८ | युवकांमधील वैज्ञानिक दृष्टीकोण | निबंध स्पर्धा |

लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S) दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

राष्ट्रीय सेवा योजना
(N.S.S)

## Mr.Ghule B.S. Addressing Students on Swami Vivekanand Birth Anniversary










लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा
योजना
(N.S.S)
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे

**लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय**

दहिगाव-ने, ता. शेवगाव, जिल्हा- अहमदनगर

कार्यक्रम अहवाल

**जागतिक एड्स दिन**

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत गुरुवार दि. ०१/१२/२०१७ रोजी 'जागतिक एड्स दिन' साजरा करण्यात आला. दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस **'जागतिक एड्स दिन'** म्हणून पाळला जातो. जगभर पसरलेल्या एड्स या जीवघेण्या रोगाबद्दल जगभर जनजागृती व्हावी आणि या रोगामुळे मरण पावलेल्यांचा शोक व्यक्त करण्यासाठी हा दिवस पाळावा असे संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केले आहे. जगभरातील सर्व शासकीय व अशासकीय संस्था आणि कार्यालयात हा दिवस साजरा करतात.

या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जिजामाता शास्र व कला महाविद्यालय भेंडे बु. येथील राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी व भूगोल विभाग प्रमुख डॉ. काकासाहेब लांडे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. लांडे यांनी एड्स या जीवघेण्या अजराबाबत प्रबोधन केले. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब वाबळे अध्यक्षस्थानी होते.

या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. रवींद्र गायकवाड यांनी प्रास्ताविक तर प्रा. आप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले.

लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय * दहिगाव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर * राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S)

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
लोकनेते मारुतराव घुले पा. महाविद्यालय
दहिगांव-ने, ता. शेवगांव, जि. अ.नगर

**Chief Guest Dr. Kakasaheb Lande Worshiping the  Goddess  Saraswati.**



**Students Expessing The Thoughts About Awareness of AIDS**





राष्ट्रीय सेवा
योजना
(N.S.S)